होऊ नये यासाठी सुचविलेल्या उपाय योजना...

महाराष्ट्र शासन,

पाटबंधारे विभाग,

शासन परिपत्रक क्र. सीडीए १०९४/५८९/(९१/९४)/लाक्षेवि(कामे)

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :20/9/98

पूर्व पिठीका :-

कालव्यावरील पारेशान व जलनिस्सारणाच्या (C.D.Works) दगडी बांधकामांची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे, असे निदर्शनास आले. पुष्कळशा ठिकाणी दगडी बांधकामात आवश्यक पुतीबल (Strength) नसल्याचे आढळून आले. विशेषत: दगडी बांधकामाच्या स्तंभात कालव्यातील मर्मस्थळी असलेल्या दगडी बांधकामात आवश्यक पुतीबल नसल्याने कालव्याच्या व्यवस्थापनात अडचण निर्माण होऊन सिंचन स्थगित करावे लागते. त्यामुळे पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यासाठी योग्य निवडीचे व चांगल्या गुणवत्तेची बांधकामे योग्य स्थळी करणे अगत्याचे आहे, जेणेकरुन व्यवस्थापनाच्या वेळेस बांधकामामुळे यात आडकाठी होणार नाही.

बांधकाम ढासळण्यास

कालव्याच्या सेवा पथाच्या पुलाचे खांब कोसळून पूल पडल्याच्या काही घटना शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. अशा प्रकारे बांधकामांना होणारा अकस्मात धोका टाळला जाणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बांधकामे विहित गुणवत्तेची व दर्जाची बांधली जाणे देखील आवश्यक आहे. याबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे देऊन देखील क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी गांभिर्याने त्याकडे लक्ष दिले नाही. परिणामत: बांधकामामध्ये दोष निर्माण झाले. निकृष्ट दर्जाची बांधकामे होण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर वेळीच कार्यवाही व्हावी या उद्देशाने शासनाने एक समिती नियुक्त केली होती. या समितीकडे अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी उपाय योजना सूचविण्याचे काम सुपुर्द केले होते.

.....2/-

[illegible]

कटाक्षाने व काटेकोरपणे पालन होणे जरूरीचे आहे.

अ) बांधकाम उच्च प्रतीचे होणे व त्यासाठी त्यावर योग्य गुण नियंत्रण असणे व महत्वाच्या कामासंबंधात त्याचे रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे.

ब) ३ मीटरपेक्षा जास्त उंचीचे किंवा कालव्यातील विसर्ग २.८ क्यूमेक्स पेक्षा जास्त असल्यास पुलाचे स्तंभ संधानकाल (concrete) असावेत. याबाबत शासनाने दि. ४ ऑक्टोबर ९३ मध्ये निर्गमित केलेल्या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे. व संधानके चांगल्या गुणवत्तेची असणे आवश्यक आहे.

क) बारमाही कालव्याच्या दगडी बांधकामाच्या स्तंभाचे पुनर्विलोकन आवश्यक असल्यास स्तंभ संधानकात करावे.

ड) महत्वाच्या बांधकामाच्या पायाजवळ सारखी पाण्याची गळती होणार नाही याकरिता काळजी घेणे आवश्यक आहे. अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्यास तसेच वाळूचा फाइननेस मॉडयुलस फार जास्त असल्यास सबळ कारणे कार्यकारी अभियंत्यांनी स्पष्ट करुन बांधकाम सिमेंट मसाला १:५ मध्ये न करता सिमेंट मसाला १:३ मध्ये करावा.

इ) स्तंभाचा पाया कठीण खडकात कमीत कमी १ मीटर खोलीवर घ्यावा.

फ) दुरुस्ती व देखभाल यंत्रणेने दुरुस्त्या हया मलमपट्टीच्या स्वरुपात न करता निदर्शनास आलेल्या दोषाचे स्वरुप निश्चित करुन त्यानुसार दुरुस्ती कोणती करावी हे ठरविणे व त्यानुसार ती वेळीच करणे आवश्यक आहे.

वरील सूचनांचे कटाक्षाने पालन केल्यास भविष्यातील दुर्घटना टाळता येऊ शकतील व उपरोक्त घटनेची पुनरावृत्ती होणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

( कॅप्टन रा. भ. पाटील )

शासनाचे अवर सचिव.

प्रत –

स्वीय सहाय्यक, सचिव (लाक्षेवि) पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई,

स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (पा) व सह सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई,

स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (पु) व सह सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई,

....3/-